ISSN 2349-638x
Impact Factor 5.707



ICSSR, New Delhi Sponsored

National Level Seminar in Interdisciplinary subject

# FINANCIAL LITERACY AND DIGITAL PAYMENT SYSTEM IN INDIA

Kisan Shikshan Prasarak Mandal, Borgaon (Kale), Tq.& Dist. Latur

Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad

## VASANTRAO KALE MAHAVIDYALAYA,

DHOKI, TQ. & DIST. OSMANABAD. (MS)

**Saturday, 28th December 2019**






**Pri. Dr. Haridas Fere**
Chief Editor

**Dr. Balasaheb Maind**
Editor

Organized By

**Department of Economics**

**Vasantrao Kale Mahavidyalaya, Dhoki**

Tq. & Dist. Osmanabad (MS).

**Vol. II**

| Sr. No. | Name of Author | Title Of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 76. | आर. डी. गणापुरे<br>डी. पी. बिराजदार | आर्थिक साक्षरता आणि भारतीयांची गुंतवणूक प्रवृत्ती | 232 |
| 77. | ज्योती ललित अधाने | डिजिटल इंडिया व वित्तीय समावेशन | 236 |
| 78. | डॉ.ज्ञानेश्वर जिगे | रोकड विरहित अर्थव्यवस्था : भारताच्या संदर्भात संधी आणि आव्हाने | 240 |
| 79. | डॉ. सुनिल अण्णा गोरडे | राष्ट्रीय कृषी बाजार (ई-नाम) प्रणालीचे एक अर्थशास्त्रीय विश्लेषण | 242 |
| 80. | डॉ.प्रमोद बालाजीराव बेरळीकर | कॅशलेस व्यवहार व ग्रामीण अर्थव्यवस्था | 244 |
| 81. | प्रा. डॉ. अनंत नरवडे | रोकडविरहित अर्थव्यवस्था- समस्या आणि उपाय | 246 |
| 82. | गोविंद रामराव काळे<br>डॉ. दिपक एम. भारती | भारतातील रोकडविरहीत व्यवहार : एक आव्हाण | 249 |
| 83. | प्रा. डॉ. ए. टी. शेवाळे | भारतातील ई-कॉमर्स - आर्थिक व्यवहार व विनिमय | 251 |
| 84. | प्राचार्य डॉ. हरिदास फेरे<br>डॉ. बी.व्ही. मैंद | भारतातील डिजिटलायझेशन आणि डिजिटल पेमेंट सिस्टिम एक अभ्यास | 254 |
| 85. | डॉ.माधवराव नरसिंगराव बिरादार | रोकडरहित अर्थव्यवस्था व रोकडरहित व्यवहाराचे विविध पर्याय | 256 |
| 86. | श्यामराव लक्ष्मण वासनीकर<br>प्रा डॉ. विजय भोपाळे | कॅशलेस अर्थव्यवस्था आव्हाने आणि उपाय | 259 |
| 87. | डॉ. एस.एस.देवनाळकर | डिजीटल पेमेंट सिस्टिमचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | 261 |
| 88. | एम. एस. बिडवे | डिजीटल ग्रंथालय, साहित्य सादरीकरण व शोधप्रक्रिया : एक अभ्यास | 263 |
| 89. | डॉ. मिनाश्री भास्कर जाधव | डिजिटल साक्षरता आणि भारतीय अर्थव्यवस्था | 266 |
| 90. | राहुल शिवाजी तिगोटे<br>डॉ. दीपक भुसारे | काळया पैशाला लगाम : रोखरहित अर्थव्यवस्था | 269 |
| 91. | आकाशनाथ दत्तात्रय बोरकर,<br>डॉ. एन.के.मुळे | निश्चिलनीकरण आणि रोकडविरहित अर्थव्यवस्था | 271 |
| 92. | डॉ. कार्तिक पोळ<br>प्रा. प्रमोद मुळे | रोकड विरहित व्यवहारात सरकारने केलेले प्रयत्न | 276 |
| 93. | प्रा. आचार्य बालाजी वैजनाथराव | रोख विरहीत व्यवहार : आव्हाने व उपाय | 278 |
| 94. | डॉ. ए. एच. अत्तार | डिजिटल इंडिया मोहीम : एक आर्थिक क्रांती | 281 |

| | | | |
|---|---|---|---|
| 116. | प्रा.डॉ.नानासाहेब पंडितराव मनाळे | डिजिटल तंत्रज्ञान : काळाची गरज – एक अभ्यास | 337 |
| 117. | डॉ. अर्जून मोहनराव मोरे | शेती उद्योग आणि सेवा क्षेत्रातील डिजीटल पध्दती | 339 |
| 118. | डॉ. महेशकुमार मोटे | कॅशलेस प्रणाली आणि ग्रामीण अर्थव्यवस्था | 342 |
| 119. | अनुराधा रामभाऊ पाऊलबुध्दे<br>प्रा. डॉ. अशोक कोरडे | भारतातील वित्तीय व्यवहारांच्या संदर्भात डिजिटल पेमेंट सिस्टम - एक दृष्टिक्षेप | 344 |
| 120. | प्रा.डॉ.एल.एच.पाटील<br>महेश शिवाजीराव नेलवाडे | कॅशलेस अर्थव्यवस्था आणि नवे पर्याय | 346 |
| 121. | प्रा. नानासाहेब श्रीरंग पटनुरे<br>प्रा. डॉ.मनोजकुमार यादवराव सोमवंशी | रोकडविरहित व्यवहारासाठी सरकारी उपाय-योजना | 350 |
| 122. | प्रा.डॉ.कालिदास दिनकर फड | कॅशलेस व्यवहार आणि बदलती माध्यमे | 353 |
| 123. | प्रा.डॉ. दैवशाला चत्रभुज रसाळ | रोकडविरहीत व्यवहाराचे फायदे – तोटे | 355 |
| 124. | प्रा.डॉ. एस.ए. सांगळे | पैसा मुक्त बाजार व्यवहारासमोरील आव्हाने व संधी | 358 |
| 125. | प्रा. डी. एन. सरडे | पारंपारिक ग्रंथालयाचा डिजिटल प्रवास: एक अभ्यास | 362 |
| 126. | डॉ.नामानंद गौतम साठे | कॅशलेस व्यवहार आणि ग्रामीण अर्थव्यवस्था | 364 |
| 127. | डॉ. एम.एल. शेळके | कॅशलेस व्यवहार : लाभ आणि आव्हाने | 366 |
| 128. | प्रा. अलका विठ्ठल शिंदे | डिजिटल प्रशासन पारदर्शकता आणि जनसहभाग | 368 |
| 129. | प्रा.डॉ. महेबुबपाशा बाबूमीयाँ शिरमाळे | आंतरराष्ट्रीय व्यापारावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास | 370 |
| 130. | प्रा. बाबासाहेब ग्यानदेव सोनवणे<br>प्रा. डॉ. एस. एस. मुळे | डिजीटल पेमेंट पद्धतीचा पंचायतराज संस्थांवरील परिणामांचा अभ्यास | 372 |
| 131. | सुमित शिवाजी सातपुते | रोकड विरहीत व्यवहार व शासकीय योजना - एक अभ्यास | 374 |
| 132. | डॉ. दीपक व्ही भुसारे,<br>जयश्री आसाराम तळेकर | डिजिटल पेमेंट व्यवस्था :- फायदे आणि अडचणी | 377 |
| 133. | प्रा.जगन्नाथ टोंपे<br>प्रा.डॉ.प्रभाकर किर्तनकार | रोकड विरहीत अर्थव्यवस्था | 379 |
| 134. | प्रा.डॉ.अनिल दि.वाडकर | डिजीटल देयक प्रणाली वस्तुस्थिती आणि विपर्यास | 381 |
| 135. | प्रा. सुकुमार दत्ता पाटील<br>प्रा.डॉ. एल.एच. पाटील | चिरंतन शेती आणि अन्नसुरक्षा यामध्ये 'डिजिटल देयकाची' भूमिका | 384 |

# चिरंतन शेती आणि अन्नसुरक्षा यामध्ये 'डिजिटल देयकाची' भूमिका

प्रा. सुकुमार दत्तापाटील
डॉ. सी.डी देशमुख वाणिज्य
सौ. कुसूमताई ताम्हाणे कला महाविद्यालय
रोहा, जि - रायगड.

प्रा.डॉ. एल.एच. पाटील
शिवाजी महाविद्यालय उदगीर

**प्रस्तावना -**

ऐतिहासिकदृष्ट्या आज शेतीमध्ये क्रांतीची मालिका सुरू झाली आहे त्यामुळे शेतीची कार्यक्षमता, उत्पादनक्षमता, उत्पन्न आणि नफा हा पूर्वीपेक्षा वाढला आहे. पुढील दशकातील बाजारपेठ अंदाजानुसार "डिजिटल कृषी क्रांती" ही सर्वात नवीन सुधारणा असेल की त्यामुळे जागतिक लोकसंख्येची अन्नधान्याची गरज भागविण्यास मदत होईल. अन्नसाखळीचा प्रत्येक भाग हा डिजिटल मध्ये बदलून जाईल. डिजिटल साधनाच्या आधारे संसाधनांचे व्यवस्थापन अधिक कार्यक्षम, अधिक पर्याप्त आणि समाधानकारक होवू शकेल. डिजिटल शेती ही अशी प्रणाली तयार करेल की जी हवामान बदलामुळे उद्भवणाऱ्या समस्यांच्या पलिकडे जावून उत्पादनक्षम, अधिक स्वीकारार्ह आणि उत्पादन वाढीस अनुकूल असणारी ठरेल. चिरंतन विकासाच्या उद्दिष्टांच्या संदर्भात डिजिटल शेतीमध्येकृषी उत्पादकतेद्वारे, बाजार संधींच्या द्वारे तसेच कमी खर्चाच्या द्वारे अधिक लाभ देण्याची क्षमता आहे. कृषी अन्नक्षेत्राचे डिजिटलायझेशन करण्याचे संभाव्य फायदे आहेत. पण त्यासाठी शेतीप्रणाली, ग्रामिण अर्थव्यवस्था तसेच समुदाय आणि नैसर्गिक संसाधन व्यवस्थापनाचे मोठे परिवर्तन आवश्यक आहे. आज भारत देशामध्ये शेतीव्यवसायाची परिस्थिती सुधारावयाची असल्यास शेतीमध्ये डिजिटल क्रांती झाल्याशिवाय पर्याय नाही. यामध्ये विशेषतः डिजिटल देयके' या संकल्पनेचा स्वीकार कृषी क्षेत्रासाठी केल्यास निश्चितच शेतकऱ्यांना त्याचा फायदा होईल. कारण शेतकऱ्यांना सरकारकडून वेळोवेळी मिळणाऱ्या रकमा, देयके, अनुदाने, आपत्कालीन मदत तसेच पीक विम्याची रक्कम ही सरळ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होईल आणि निश्चितच शेतकऱ्यांना त्याचा फायदा होईल. तसेच ही मदत थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होत असल्याने यामध्ये कोणताही मध्यस्थ किंवा सरकारी अधिकारी यांचा हस्तक्षेप होणार नाही आणि त्यामुळे भ्रष्टाचाराला आळा बसेल. कृषी अन्नपध्दतीच्या डिजिटलायझेशनमध्ये ग्रामिण आणि शहरी भाग, स्त्री आणि पुरूष तसेच तरूण लोकसंख्याइत्यादींना होणारा संभाव्य लाभ असमानरित्या वाटला जाण्याचा धोका आहे. एखादा भाग डिजिटल होण्यासाठी त्या भागात इंटरनेट तसेच इंटरनेट टॉवर्स इत्यादीचा विकास होणे गरजेचे आहे. आणि ही सर्व व्यवस्था शहरी भागात मोठ्या प्रमाणावर असते त्यामुळे शहरी भागाला डिजिटल यंत्रणेचा फायदा आधिक होण्याची शक्यता असते.

**संशोधनातील कूट शब्द-** डिजिटल देयक, चिरंतन शेती व अन्नसुरक्षा

ISSN 2349-638X
www.aiirjournal.com

**३) संशोधनाची उद्दिष्टे-**

i) डिजिटल देयक ही संकल्पना समजून घेणे.

ii) चिरंतन शेतीची संकल्पना समजून घेणे.

iii) चिरंतन शेती आणि अन्नसुरक्षा यामध्ये डिजिटल देयकाची भुमिका अभ्यासणे.

**४) संशोधनाची गृहितके-**

i) डिजिटल देयकामुळे पैसा, वेळ आणि श्रम यामध्ये बचत होते.

ii) डिजिटल देयकामुळे भ्रष्टाचाराला आळा बसतो.

iii) डिजिटल देयकामुळे योग्य व्यक्तींकडे त्यांची योग्य देणी पोहोचतात.

**५) डिजिटल परिवर्तनासाठी अटी आणि डिजिटल देयकाची गरज -** शेती क्षेत्रामध्ये डिजिटल परिवर्तनासाठी कांही महत्वाच्या अटी आहेत त्या पुढीलप्रमाणे.

i) पहिली अट म्हणजे डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी मूलभूत परिस्थिती आवश्यक आहे त्यामध्ये या तंत्रज्ञानाची उपलब्दता तसेच परवडणारी क्षमता आणि माहिती तंत्रज्ञान उपलब्दता व माहिती तंत्रज्ञास सहाय्यक आणि धोरणात्मक कार्यक्रम राबविले पाहिजेत.

ii) दुसरी अट म्हणजे इंटरनेट, मोबाईल फोन, डिजिटल कौशल्य आणि सोशल मिडियाचा उपयोग कसा करून घ्यावा याची माहिती व्यक्तीला असणे गरजेचे आहे.